Review Of Research
Vol. 4 | Issue. 2 | Nov. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# हिंदुत्व वादाची ऐतिहासीक चिकीत्सा आणि सावरकरांची हिंदु महासभा व तीचे राजकारण

**प्रा. डॉ. अंबादास नरहरी बिराजदार**
**यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर, जि. उस्मानाबाद (महाराष्ट्र).**

**प्रस्तावना**

भारतीयांनी संसदीय लोकशाही पद्धती स्विकारली. संसदीय लोकशाहीला अभिप्रेत असलेली जीवनपद्धती विकसीत करण्यासाठी आवश्यक असणारी सामाजिकरणाची, राजकीय प्रक्रिया दिर्घकाळापासून भारतात घडत होती. स्वातंत्र्य प्राप्तीच्या उद्दीष्टासाठी उभे केलेले जन अंदोलन आणि चळवळीमुळे जनतेमध्ये राजकीय जागृती घडत गेली. स्वातंत्र्यपूर्व काळात राजकरणाची आशय आणि व्याप्ती जनजागरणाशी संबंधीत होती. राजकारण करणे म्हणजे जनजागरण घडवून आणणे, लोकांना कृतीप्रवण करणे, कार्यप्रवण करणे असा अर्थ स्वातंत्र्य चळवळीने रुढ केला व विकसीत केला. राजकाणासंबंधीची ही जाणीव सर्वसामान्यपणे स्वातंत्र्योत्तर काळातही टिकली. लोकांना कृतीप्रवण करणे, सभा, संमेलने, इ. द्वारा लोकांना राजकीय दृष्टी देणे ह्या बाबी राजकारणाच्या प्रक्रियेचा वैध घटक म्हणून मान्य झाला. स्वातंत्र्योत्तर काळांत सत्तारुढ काँग्रेसच्या विरोधकांनी वेळोवेळी अशा कृतीप्रवण राजकारणाचा आधार घेऊन राजकारणांत व जनमानसात स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला. कामगार चळवळी, भाषिक अंदोलने, इतर प्रादेशिक प्रश्नासाठी चळवळी उभ्या करुन राजकीय प्रक्रीयेला वेग देण्याचा प्रयत्न करुन लोकशाहीवादी अवकाश अधिक व्यापक करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. विशेषत: राज्य निर्मितीच्या अंदोलनामध्ये राज्याराज्यामधील अंतर्गत प्रबळ घटक पुढे सरसावले आणि त्यांना स्थानिक राजकारभारावर आपली पकड निर्माण केली. मुख्यत्वे प्रादेशीक राजकीय पक्षाचा उदय आणि राजकारण स्वाभाविकपणेच स्वातंत्र्यपुर्व काळातील कृतीप्रवण राजकारणचा परिपाक आहे. नेहरू युगात काँग्रेस विरोधी पक्षाला निवडणुकांमध्ये कधीही व्यापक प्रमाणावर यश मिळु शकले नाही. याचे मुख्य कारण म्हणजे काँग्रेसने स्विकारलेले सार्वमत सदृश्य धोरण. देशाच्या आर्थिक विकासाच्या संदर्भात औद्योगिक विकासाचे धोरण, स्वयंपुर्ण राष्ट्राची निर्मीती आणि अखील भारतीय लोकशाही समाजाची बांधणी हे मुख्यत: काँग्रसचे धोरण राहिले. नेहरूंचे नेतृत्व आणि त्यांनी कॉग्रेस संघटनेला दिलेली धोरणत्मक दिशा हे कॉग्रेसच्या यशाचे रहस्य होते. नेहरू हे लोकनेते होते. ते कोणत्याही एका घटकाचे नेतृत्व करीत नव्हते तर ते देशाचे नेते होते. काँग्रेस एक पक्ष संघटना म्हणुन देश पातळीवर उभारलेली होती. काँग्रेसचे विविध प्रादेशिक नेते प्रादेशिक पातळीवर निवडणुका लढवू शकत होते, परंतु देशव्यापी पातळीवर स्पर्धात्मक राजकारणात टिकण्यासाठी त्यांना नेहरुंचे नेतृत्व आवश्यक होते. नेहरुंचे नेतृत्व अखील भारतीय पातळीवर असल्याने स्थानिक प्रादेशिक नेतृत्व आणि देशव्यापी पातळीवरचे नेतृत्व असा सुसंवाद निर्माण होऊ शकला. नेहरू युगांत काँग्रेसचे राजकारण अखिल भारतीय पातळीवरील सार्वमत सदृश्य राजकारण व प्रादेशिक पातळीवरील स्थानिक हितसंबंध यांच्या संयोगातुन अकारास येत गेल्याने निवडणूकातील काँग्रेसचे यश निश्चित ठरलेले असे. स्वातंज्यप्राप्तीनंतर भारतीय जनसमूहमनावर काँग्रेसचा आणि काँग्रेसच्या स्वातंज्य अंदोलनाचा प्रभाव निर्माण झालेला होता. काँग्रेसला पर्यायी अशी राजकीय संघटना आणि लोकशाही राजकारण करू शकणारी हिंदू संघटना म्हणून हिंदू महासभेचा उल्लेख होवू शकतो, परंतू दुर्दैवाने गांधी हत्येचे पातक हिंदूत्ववाद्यांच्या डोकीवर फूटले आणि दिर्घकाळापर्यंत भावी राजकीय अपयशाला हिंदूत्ववाद्याना सामोरे जावे लागले. हिंदूत्ववाद्यांचा

अभ्यास करत असताना त्यांची ऐतिहासीक कामगीरी कोणती? त्यासंदर्भात अनेक पुरोगामी विचारवंतानी जी ऐतिहासिक चिकीत्सा केली त्याचे स्वरूप समजून घेणे अपरिहार्य ठरते.

**हिंदुत्व वादाची ऐतिहासीक चिकीत्साः**

स्वातंत्रोत्तर काळातील बिगर काँग्रेसी मुख्यत्वे हिंदुत्ववाद्याचे राजकारण मर्यादित परिघात फिरत राहिले. याचा परिणाम हिंदुत्वावाद्यांना दिर्घ काळापर्यंत निवडणुकांमध्ये यश मिळु शकले नाही. हिंदुत्ववाद्यांना निवडणुकामंध्ये आलेले अपयश वस्तुतः हिंदुत्ववादी चळवळीच्या इतिहासाशी संबंधीत आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. नेमकेपणे हिंदुत्ववादी संघटनाच्या स्वातंत्र्यपुर्व काळातील इतिहास कोणता व कसा आहे ?

बॅ. सावरकरांची हिंदुमहासभा आणि डॉ. हेडगेवार यांनी स्थापन केलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या दोन हिंदुत्ववादी संघटना आणि त्यांचे स्वातंत्र्यपुर्व काळातील योगदान या अनुषंगाने लक्षात घेणे आवश्यक आहे. १ ऑगस्ट १९२० रोजी टिळकांचे निधन झाले. टिळकांच्या मृत्युनंतर भारतीय राजकारभाराची सुत्रे गांधीजींकडे आली. १९२० ते ३० जानेवारी १९४८ पर्यंत म्हणजेच गांधीजींच्या हत्येपर्यंत स्वातंत्र्य चळवळीची व भारतीय राजकारणाची सुत्रे गांधीजींच्याकडे होती.

"गांधीनी आणि त्यांच्या काँग्रेसी अनुयायांनी ब्रिटीशांच्या विरोधात अहिंसेच्या शस्त्राने लढा दिला. हिंदुत्ववाद्यानी नेहमीसाठी सशस्त्र लढ्याची भाषा केली. परंतु प्रत्यक्षात हिंदुत्ववाद्यांनी ब्रिटीशांच्या विरोधात एकही सशस्त्र उठाव केलेला नाही. ही एक ऐतिहासीक वस्तुस्थीती आहे. त्यांनी फक्त गांधीजींची चेष्टा करण्यावर भर दिला."

"इ.स. १९३७ ते १९४७ सावरकरांनी आणि त्यांच्या अनुयायांनी जे लढे दिले त्याचं स्वरूप भागानगर निशस्त्र प्रतिकाराचे तरी होते किंवा निवडणुका लढविण्याचे होते. केळकरांसारख्या टिळकानुयायांनी तर कोणताच लढा दिला नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघटना केवळ संघटना बांधत राहिली. हे सगळेच हिंदुत्ववादी १९२० नंतर प्रतिसहकारवादी झाले. इंग्रजांच्या विरोधात एकही हिंदुत्ववादी स्वातंत्र्य चळवळीच्या लढ्यात उतरलाच नाही. "लढले गांधीजी. ते लढा लढणारे किती बावळट आहेत याची मिटक्या मारीत वर्णने केली ते हिंदुत्ववाद्यांनी न लढणाऱ्याचा हा वाचळपणा सतत २५ वर्षे टिकलेला एक स्वातंत्र्य द्रोहच होता.
(नरहर कुरुंदकर, शिवरात्र)

ज्या सशस्त्र लढ्याचा व सशस्त्र क्रांतीचा जयघोष हिंदुत्ववाद्यांनी केला त्याच्या पिस्तुलांना कासीम रझवी किंवा महंमद अली जीना किंवा निझाम दिसले नाहीत. त्यांच्या पिस्तुलातील गोळी १९२० नंतर इंग्रजांच्या विरोधी झाडली गेली नाही. जणु ती गोळी अहिंसावादी गांधीच्यासाठी होती. (नरहर कुरुंदकर, शिवरात्र).

वस्तुतः या देशांत हिंदुंची प्रचंड लोकसंख्या आहे. फाळणीपुर्व भारतात हिंदुंची लोकसंख्या ७५% होती. तरीही ज्या हिंदुत्ववाद्यांनी हिंदु संघटन हा विचार मांडला त्यांच्या मागे हि हिंदुची मते का गेली नाहीत? दुर्दैवाने आमच्या देशातील हिंदुत्ववादी पक्षांना हिंदु जनतेविषयी कधीही विशेष आस्था वाटली नाही. आजही जनतेची आस्था हिंदुत्ववादाला दिसत नाही. जर अशी परिस्थीती नसती तर या देशात हिंदुत्वावाद्याचा पराभव होणे शक्य नव्हते. १९५२ ते १९८० पर्यंतचा राजकीय सार्वत्रिक निवडणुकांचा अहवाल पाहिल्यास हिंदुत्ववादी राजकीय पक्षांना सार्वत्रिक निवडणुकामध्ये एखादा दुसरा अपवाद वगळल्यास सार्वत्रिक पातळीवर भारतीय जनतेने झिडकारलेले आहे. हिंदु धर्मातील राजकारणात पुरोहीत, जमीनदार व हितसंबधीय असे मोजकेच लोक सोडल्यास कुणी येणे शक्यच नव्हते. डॉ. शामाप्रसाद मुखर्जीनी स्थापन केलेल्या जनसंघाचे एकूण स्वरूपच अत्यंत मर्यादीत राहीले. हिंदुचे प्रश्न हाती घेऊन सोडविल्याशिवाय हिंदुत्ववाद बळकट होणे शक्यच नव्हते. लोकमान्य टिळकांच्या हयाती पर्यंत हिंदुत्ववादी राजकीय स्वातंत्र्यासाठी झटत होते. टिळकांच्या मृत्युनंतर हिदुत्ववादयांनी ब्रिटीशा विरोधात एकही राजकीय लढा दिलेला नाही ही वस्तुस्थिती आहे.

सामाजिक प्रश्नाबाबत हिंदुत्ववाद्यांची नेमकी भुमीका कोणती? सामाजिक प्रश्नाबाबत सावरकर सजग होते. त्यांनी मुख्यतः धर्माच्या व सामाजिक जीवनाच्या संदर्भात सावरकारांनी पुर्णतः विज्ञानानिष्ठ दृष्टीकोन स्विकारला. त्यांनी आपल्या लिखणातून आणि भाषणांतुन सामाजिक सुधारणेचा विचार मांडला. स्वातंत्र्यविरांनी एक पतीत पावन मंदीर उभे केले. आणि ते सर्वासाठी खुले केले. परंतु सनातनवादयांच्या आधिकाराखाली असलेले हिंदुची प्रतिष्ठीत मंदीरे खुली करण्यासाठी लढे दिले नाहीत. सावरकरांच्या विज्ञाननिष्ठ हिंदुत्ववादाला मुख्यतः सनातनी ब्राम्हणांचा विरोध होता. कारण सावरकरांचा विज्ञाननिष्ठ हिंदुत्ववाद साहजिकच पौरोहीतवादाला छेद देणारा होता. सावरकर

आणि त्यांची हिन्दु महासभा केवळ सनातनी ब्राम्हण समाजापुरती मर्यादीत राहीली. सावरकरांचे सामाजिक विचार म.फुले वा डॉ.आंबेडकर यांच्या विचारापेक्षा कुठेही कमी नव्हते. चार्तुवर्ण्य, रोटीबंदी, बेटीबंदी, धर्मग्रंथ प्रामाण्य, वर्णवर्चस्व, भटशाही यांच्या विरुध्द त्यांनी क्रांतीकारक विचार मांडले, त्या साठी त्यांना ब्राम्हण वर्गासीच संघर्ष करावा लागला. इतर वर्णा विरुध्द आमचे हक्क द्या म्हणुन लढने सोपे असते. परंतु स्वतःच्याच वर्णाविरुध्द तुमचे हक्क सोडा म्हणुन संघर्ष करणे अवघड असते ही वस्तुस्थिती पण या संदर्भात लक्षांत घेणे आवश्यक आहे. याचाच अर्थ असा की, जरी सावरकरांचा सामाजिक जीवनाविषयीचा दृष्टीकोन हा जरी वैज्ञानिक होता तरी त्यांच्या प्रयत्नांना आणि वैचारीक भुमिकेला सनातनी धर्मावाद्यानीच विरोध केला. या देशातील हिंदुत्ववाद नेहमीच या देशातील जनतेचा द्रोह करीत आला आहे. आणि असे घडणे अपरिहार्यच होते. हिंदुत्ववादाला हिंदुधर्माचे प्रेम आहे हा धर्म ज्या जनतेने सहस्त्रावधी वर्षे प्रेमाने व निष्ठेने जतन केला त्या जनतेचे प्रेम नाही. कारण सगळेच धर्म राजेशाहीच्या सरंजामशाहीच्या वातावरणांत विकसीत होतात तसे हिंदु धर्माचेही स्वरुप आहे.छ हिंदु धर्मातील वर्णव्यवस्था जातीय श्रेणीबध्दता शुद्र, शुद्रादिकाना मिळणारी अमानवीय वागणुक, अस्पृश्यंाना व या सर्व विषम व्यवस्थेला मिळालेला धर्माचा आधार, आणि धर्मगुरुंनी दिलेला पाठींबा या सर्व बाबी विचारांत घेण्यासारख्या आहेत. हिंदुत्ववाद्यानी धर्मातील या उणीवा दुरुस्त करण्याबाबत कधीही सामाजिक अंदोलने व चळवळी उभ्या केल्या नाहीत.

सावरकर १९३७ पर्यंत रत्नागीरीत स्थानबध्द होते. त्यांच्यावर राजकीय बंधने होती. १९३७ ते ४७ पर्यंत ही सर्व बंधने संपलेली होती. या काळांत वस्तुतः त्यांना अस्पृश्यांना मिळणाऱ्या हीन वागणुकी बाबत अंदोलन उभा करता आले असते. परंतु सावरकर किंवा त्यांच्या अनुयायांनी हरीजनांना सवर्ण हिंदुच्या बरोबर समतेचा दर्जा मिळण्यासाठी एकही अंदोलन उभे केलेले नाही. इथे ज्या ज्या वेळेला अस्पृश्यंाचा प्रश्न उभा राहीला, त्या त्या वेळेस धर्म अस्पृश्याच्या विरोधांत उभा राहीला महाडचा चवदार तळयाचा प्रश्न असों की, नाशिक येथील काळाराम मंदीर प्रवेश असो या प्रश्नाचा विचार करता वस्तुस्थिती अशी लक्षांत येते की पाणी भरण्यासाठी व आपला हक्क बजावण्यासाठी गेलेल्या हरीजनांना समाज आपल्या विरोधी जाणार हे माहीतच होते कारण समाज परंपरावादी असतो. पण हिंदुचे हिंदु धर्माभिमानी जाणते सुशिक्षीत नेते होते तेही बुध्दीवाद सांगत अस्पृश्याच्या विरोधी उभे राहीले तेंव्हा हे स्पष्ट होते की, धर्म संघटनाआणि हिंदू धर्मवांद्यांनी सामाजिक सुधारणावादी विचाराला आणि कृतीला विरोधच केला.

डॉ. आंबेडकरांनी आपले सबंध आयुष्य दलीत अस्पृश्याच्या उध्दारासाठी व त्यांच्या न्याय मानवी हक्कांसाठी खर्च केले. महाडच्या सत्याग्रहानंतर डॉ.बाबासाहेबांनी नाशिक येथील काळाराम मंदीर प्रवेशासाठी अंदोलन केले. (१९३०) काळाराम मंदीर प्रवेशासाठी उभे केलेले अंदोलन संपुर्ण महाराष्ट्रभर गाजले. अस्पृश्याच्या या अंदोलनाला कटटर सनातन्यांनी विरोध केलाच परंतु सामाजिक सुधारणेचा वसा घेतलेल्या हिंदुत्ववाद्यानीही या अंदोलनाबाबत कसलीच स्पष्ट भुमीका स्विकारली नाही. हिंदुत्ववादी संघटना आणि हिंदुत्ववादी नेत्यांची सामाजिक सुधारणे बाबतची भुमिका नेहमीच संदिग्ध राहीली. व्यासपिठावरुन सुधारणे संबंधीच्या चर्चा जोरदारपणे करावयाच्या आणि प्रत्यक्ष व्यवहांरात मात्र आपली कर्मट व पारंपारिक भुमिका बदलावयाची नाही अशी दुहेरी भुमिका सातत्याने हिंदुत्ववाद्यांनी स्विकारली.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आणि भारतीय राज्यघटनेच्या स्विकारानंतर या देशातील दलितांचा व अस्पृशाचा प्रश्न एका वेगळया वळणांवर आल्याचे दिसते. दलितांना आणि अस्पृशाना डॉ. बाबासाहेबानी नव्याने दिलेली अस्मिता आणि जाणिवा प्रखर स्वरुपांत जीवंत ठेवण्यासाठी आणि स्वतःचे स्वतंत्र जीवनस्थान व सामाजिक स्थान उभे करण्यासाठी बाबासाहेबांनी आपल्या अनुयायांसह बौध्द धर्मात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आणि त्यांनी १९५६ च्या डिसेंबर मध्ये अंमलाता आणला. या ऐतिहासीक घटनेबाबत हिंदुत्ववाद्यांची भुमीका नकारात्मक आणि अव्हेलनात्मक होती. स्वा. सावरकरांना अभिप्रेत असलेला हिंदू राष्ट्रवाद हा व्यापक, सिध्दांतावर आधारित आहे. त्यांना भारत हे एक सामर्थ्यशाली राष्ट्र म्हणून उभे राहण्यासाठी परंपरेने भारतीय हिंदू समाजामध्ये अस्तित्वात असलेल्या सर्व समाज घटकांचा समावेश अभिप्रेत आहे. त्यादृष्टीने अंबेडकरानी केलेले धर्मांतर हे एका दृष्टिने हिंदू समाजाच्या संघटीत जीवनाला आणि व्यवस्थेच्या ऐक्याला छेद देणारे आहे. याशिवाय हिंदूची संख्या या धर्मांतरामुळे घटणार आहे हि वस्तुस्थिती सावरकरांच्या लक्षात येत होती. सावरकरांचा याबाबतचा दुसरा दृष्टिकोन देखिल लक्षात घेणे आवश्यक आहे. बौध्द धर्म हा अहिंसावादी. भारतीयांची अहिंसावादावर प्रचंड निष्ठा याचाच परिणाम म्हणून भारतीयांच्या अस्तित्वावर सातत्याने बाहेरील लोकांकडून आक्रमणे झाली. अहिंसेचे तत्व दिर्घकाळापासून भारतीय जीवनावर प्रभावी ठरल्याने भारतीयांचा इतिहास हा सततचा पराभूताचा इतिहास ठरला. सावरकरांची निष्ठा शस्त्र सामर्थ्यावर होती.

तत्कालीन युरोपियन राजकारण शस्त्र सामर्थ्याचे आणि संघर्षाचे राजकारण होते. ही वस्तुस्थिती लक्षात घेवून भारतीय समाजातील एक फार मोठा समाज घटक अहिंसा तत्वाच्या प्रभावाखाली गेला तर त्याचे राष्ट्राच्या दृष्टिने इष्ट परिणाम होणार नाहीत. ही वस्तुस्थिती लक्षात घेवून सावरकरांनी डॉ. अंबेडकरांच्या धर्मांतरावर टिका केली. (डिंसेबर - १९५६).

**सावरकरांची हिंदु महासभा व तीचे राजकारण :-**

सावरकर आणि त्यांची हिंदुमहासभा याचं स्वातंत्र्यसंग्रामातील योगदान काय? त्यांच्या राजकारणाची नेमकी वाटचाल कोणती? त्यांना अभिप्रेत असलेले राजकीय उदिष्ट व मार्ग कोणते ? असे कांही प्रश्न हिंदुत्ववादी राजकारणाचे यश अपयशाच्या अनुषंगाने निर्माण होतात. वस्तुत: सावरकर प्रणीत हिंदुमहासभेने देशाला राजकीय स्वातंत्र्यासाठी कोणतेही जन अंदोलन उभे केलेले नाही. त्यांची एकूण भुमीका प्रतिसहकाराची होती. या संदर्भात श्री.के.एल. लुटेना या राजकीय विचारवंताने The Panjab Hindu Mahasabha & communal Politics १९०६-१९२३.या नावाचे पुस्तक लिहीले आहे. हिंदु महासभेबददल लिहीताना या पक्षाने त्याची स्थापना झाल्यापासुन एकदाही वसाहतवाद विरोधी लढयात भाग घेतला नाही. एवढेच नव्हे तर ब्रिटीश राजवटीत जे अनेक अत्याचार जनतेवर झाले, लाठीमार, गोळीबार, अश्रुधुर, इतकेच नव्हे तर अगदी जालीयनवाला बाग मधील अत्यंत क्रुर असे हत्याकांड सुध्दा झाले. परंतु या प्रकाराविरोधी एक शब्दानेही हिंदु महासभेने निषेध व्यक्त केला नाही. ---- याच पुस्तकात लेखकाने हिंदुमहासभेच्या ब्रिटीशांपुढे लाचारी आणि हांजी हांजी करणाऱ्या प्रवृत्तीवर प्रकाश टाकला आहे. यांत हिंदुमहासभेने केलेल्या एका ठरावाचा उल्लेख केलेला आहे. या ठरावात इंग्रज हे आर्य वंशाचेच असुन हिंदुस्थानातील ब्रिटीश सत्तेमुळे ताटातुट झालेल्या दोन शाखांचे मिलन झाले आहे असे म्हंटले आहे.--- तो ठराव असा.

"आमचा असा दृढ विश्वास आहे की, भूतकाळातील एक ऐतिहासीक काळखंडात दुर्दैवाने ताटातुट झालेल्या दोन आर्यशाखांचे आता दयाघन परमेश्वराच्या कृपेने हिंदुस्थानात पुनर्मिलन झालेले आहे. यातील एकीने जी अधिक सुसंस्कृत आणि ज्ञानी आहे. दुसरी जी आडाणी आणि मागासलेली राहीली. राजकीय प्रभुत्व प्रस्थापित करावे. तीला मार्गदर्शन करून संरक्षण द्यावे. ती पण परमेश्वराची योजना आहे. ज्यावर सुर्य कधीच मावळत नाही अशा साम्राज्याचे आम्ही एकनिष्ठ नागरीक आहोत. हे आम्ही सिध्द केले असुन आम्हाला त्याचा अभिमान वाटतो. ब्रिटनच्या सम्राटाकडे हा विशेष अधिकार असाच रहावा अशी आमची अंतरीक तीव्र इच्छा आहे.(A new Brand of History-- विश्वमोहन झा. Front Line १४$^{th}$ March २००३)

हिंदुमहासभेचा वरील ठराव हिंदुमहासभेच्या राजकारणाची नेमकी दिशा कोणती हे स्पष्ट करतो. एकीकडे ब्रिटीश सत्ताधाऱ्याची तरफदारी करावयाची आणि त्याच वेळेस देशाच्या स्वातंत्र्यासाठी हिंदुधर्म संघटना उभी करावयाची ही रणनिती निश्चितच लोकांची (सामान्य जनतेची) दिशाभुल करणारी होती. हिंदुत्व विचारांची कास धरणाऱ्या हिंदुत्ववाद्यांना जर्मनी विषयी पण प्रेम होते. बॅ. सावरकरांनाही हिंदुनी जर्मन आर्याचे अनुकरण करून सनातन हिंदु धर्माचे पुनरर्जीवन करावे असे वाटत होते. मार्जिया कॅसोलारी यांनी त्यांच्या हिंदुत्ववाद्यांचे विदेशी लागेबांधे या शोधनिबंधात बॅ. सावरकरांच्या एका निवेदनाचा उल्लेख केला आहे. हे निवेदन २५ मार्च १९३९ साली हिंदुमहासभेने बॅ. सावरकांचे निवेदन म्हणुन प्रसिध्द केले आहे. हे पत्रक दुसऱ्या महायुध्दाच्या प्रारंभी जेव्हा लोकशाही आणि फॅसिझम यांच्यात जागतिक वर्चस्वासाठी अटीतटीचा संघर्ष सुरू होता तेंव्हाचे आहे. सावरकरांचे निवेदन असे आहे "हिंदु आणि जर्मन या एकाच वृक्षाच्या दोन शाखा आहेत.आर्य संस्कृतीचे पुनरूज्जीवन आणि स्वस्तिकचे उदात्तीकरण करणाऱ्या जर्मनांचा प्रयत्न निश्चितच प्रशंसनीय असुन इन्डो-जर्मन सभ्यतेची तरफदारी व वैदिक ज्ञानाबद्दलची आस्था या मुळे हिंदुस्थानातील धार्मिक हिंदुमध्ये जर्मन राष्ट्राविषयी विशेष सहानुभुती असुन जर्मनीच्या या धोरणाचे हिंदु जनता स्वागत करते." माझ्या मते आर्य संस्कृतीच्या पुनरूज्जीवनासाठी जर्मनीने सुरू केलेले धर्मयुध्द जगातील सर्व आर्यांना विशेषत: हिंदुस्थानातील हिंदुंना प्रेरक ठरून त्यांना गौरव प्राप्त करून घेण्याचे सामर्थ्य देईल." (मार्जीया कॅसोलारी, हिंदुत्ववाद्यांचे विदेशी लागेबांधे).

दुसऱ्या महायुध्दाच्या अत्यंत निर्णायक आणि संवेदनशील क्षणीसुध्दा हिंदुत्ववादी एकीकडे ब्रिटीशांचे लांगुलचालन करत होते तर दुसरीकडे फॅसिस्ट हुकूमशाहीचा गौरव करत होते. हिंदुत्ववाद्यांच्या या धोरणाबध्दल आश्चर्य वाटण्यांसारखे कांहीच नाही. कारण ब्रिटीश साम्राजशाही विरोधांत लढण्याऐवजी देशातील हिंदुत्ववाद्यांचे शत्रु कॉंग्रेस आणि मुस्लिम विरोधी लढणे हे त्यांचे धोरण होते. हिंदुत्ववाद्याचे हे दुटप्पी धोरण सामान्यजनांच्या डोळयांत धुळ फेकणारे आणि त्यांच वेळेस हिंदुधर्मीय सामान्यांना फसविणारे होते. कॉंग्रेसच्या विरोधात एक राजकीय पक्ष म्हणुन

इ.स. १९३३ पूर्वी हिंदू महासभा कधी आली नाही. प्रारंभी हिंदूच्या जातीय चळवळीचे स्वरुप सुधारण्याचे होते. शुध्दी व संघटना या बाबी गृहीत धरुन देखील, हिंदु जातीयवादयाने मनस्मृतीचा कायदा आणावा असे म्हटले नाही. १९३७ साली हिंदुमहासभेने द्विराष्ट्रवाद मान्य केला. स्वातंत्र्यपूर्व काळी देखील हिंदु महासभेला सुशिक्षीत हिंदु वर्गाचा पाठींबा मिळू शकला नाही. ब्राम्हणवादी हिंदु महासभेला पाठीमागे नव्हते. सर्व लोकप्रिय ब्राम्हण नेते काँग्रेस मध्ये होते ही वस्तुस्थिती आहे.

हिंदुमहासभा मुस्लीम प्रश्नाबाबत अगदी टोकाची भुमिका घेत असल्याचे त्यांच्या धोरणात्मक वस्तव्यावरुन दिसते, धोरणात्मक पातळीवर मुस्लीम विरोधी आणि राजकीय व्यवहारिक पातळीवर मुस्लीम लीगसी हातमिळवणी हा असा राजकीय प्रवास १९३७ च्या निवडणुकीनंतर झाल्याचे दिसते.

विश्वमोहन झा- फ्रंटलाईन १४ मार्च २००३ च्या अंकात म्हणतात. १९३७ च्या निवडणुकीनंतर सिंध आणि बंगाल प्रांतात मुस्लीम लीगची मंत्रीमंडळे स्थापन झालेली होती. या दोन्ही मंत्री मंडळात हिंदु महासभाही सहभागी झालेली होती. एकीकडे मुस्लीमाचा धोकादायक शत्रु म्हणुन उल्लेख करावयाचा आणि सोयी नुसार त्यांच्याशी शय्या सोबत करावयाची, त्याचवेळी काँगेसला विरोध करुन ब्रिटीश सत्ताधाऱ्याची चापलुसी करावयाची असे हिंदू महासभेचे धोरण होते. इतकेच नव्हे तर सिंध मधील मुस्लीम लीगच्या मंत्रीमडळे सिंध प्रांताच्या विधी मंडळात पाकीस्तान निर्मितीचा ठराव पास केला. त्या वेळी मंत्रीमंडळातील हिंदु महासभेच्या मंत्र्यांनी आणि विधानासभेतील आमदारांनी ठरावाला विरोध करुन बाहेर पडण्याऐवजी फक्त मुक आणि सौम्य निषेध नोंदविला. Anew brand of History- विश्वमोहन झा. Frount line १४ th march २००३.

स्वां. सावरकराची हिंदुमहासभा आणि तिचे राजकारण या अनुषंगाने वरील कांही उदाहरणे अभ्यासल्यास नेमकेपणाने हिंदुत्ववाद्यांना काय अपेक्षित होते असा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. मार्जिया कॅसोलरी यांनी म्हटल्या प्रमाणे १९२०-४७ या दरम्यान हिंदुत्ववादी पक्ष कधी इटली तर कधी जर्मनी तर कधी ब्रिटीशावर फुले उधळण्याचे काम करीत होते हेच खरे. लोकशाही की फॅसीस्टवाद या राजकीय विचार प्रणालीच्या संबंधाने हिंदुत्ववाद्याची भुमीका नेहमीसाठी फॅसिवादाच्या बाजुने होती. हे स्पष्ट जाणवते. गांधी व नेहरु यांची काँग्रेस प्रथमपासुनच लोकशाहीवादी व्यवस्थेची आणि तीला आधारभुत असणाऱ्या मुल्यांची मांडणी करीत होती. स्वतंत्र भारतात संसदीय लोकशाही, प्रौढ मतदान सर्वांना स्वांतत्र्य, समता, मुलभूत अधिकाराची सर्वासाठी तरतुद ही विचार परंपरा जोपासत होती व तिची मांडणी करीत होती. या उलट हिंदुत्ववाद्यांचा संसदीय लोकशाही ही परकीय राजकीय व्यवस्थेला हिंदु आत्मा नसलेला राजकीय प्रकार म्हणुन हिणत्वाने उल्लेखीला.

सावकरकरांचा हिंदुत्ववाद समजुन घेत असताना भारतामधील हिंदु-मुस्लिम प्रश्न मुलगामी दृष्टीकोनातुन समजुन घेणे आवश्यक आहे. हिंदु समाजाचा इतिहास अभ्यासत असताना हिंदु समाजाचाअनेक आक्रमकाशी जो संबंध आला तो लक्षांत घेणे अपरिहार्य आहे. हिंदु समाज हा शब्द भौगोलीक अर्थाने म्हणजे सिंधु नदीपासुन ते दक्षिण सागराच्या पर्यंतच्या प्रदेशात वस्ती करुन राहणारा मानवी समाज असा घेणे रास्त ठरते.

भारतावर झालेले इस्लामचे आक्रमण हे ८ व्या शतकातले मुसलमानी आक्रमन हे सर्वार्थाने वेगळे होते. हे जसे राजकीय आक्रमण होते, तसेच ते सांस्कृतिक आक्रमण होते. भारतामध्ये ईस्लाम फोफावण्यासाठी येथील स्थानिक सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती कारणीभुत होती हे वास्तव आपण नाकारु शकत नाही. अरबस्तानामध्ये ईस्लाम हा त्या कांळात एक प्रागतिक विचार होता प्रस्थापितांच्या विरोधातील तो समतेसाठी आवाज उठविणार नवा विचार प्रवाह होता. भारतात ईस्लामी आक्रमकांनी मंदीरे फोडली, हिंदु राजांची धिंड काढली, त्यांना अपमानीत केले, स्त्रीयांची अब्रु लुटली, अत्याचार केले. हे खरे आहे परंतु मुसलमानांकडुन हे सर्व घडत असताना संख्येने प्रचंड असुनही हिंदु काय करीत होते? मुस्लीम धर्म वेडे, दुष्ट, आक्रमक म्हणुन विशेषणे लावून त्यांनी भारतात स्थापन केलेली साम्राज्ये, त्यांचे स्वरूप व त्यामागील कारणे ऐतिहासिक वास्तव समजुन घेतल्याशिवाय आपल्याला नीट समजावून घेता येणार नाहीत.

ज्या वेळी ईस्लामिक आक्रमण भारतावर झाले त्या वेळी भारतीय समाजाचे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवन कसे होते याचे आकलन झाल्याशिवाय आपणास ईस्लामच्या आक्रमकाच्या विजयाची कारणे समजणारच नाहीत. तत्कालीन हिंदु राजे व सामंत यांचा जो एक सत्ताधारी वर्ग होता तो सामान्य जनतेशी कसा वागत होता? सामान्य शेतकरी व शुद्रातिशुद्रांना हे राजे लोग व त्यांचा सामंत वर्ग कसा वागवीत होता? या प्रश्नांचे उत्तर शोधणे म्हणजे सामाजिक व आर्थिक वास्तवाच्या कसोंटयावर हिंदु राजे आणि सामान्य जनता यांचे नाते संबध

तपासणे होय. सर्व हिंदुत्ववादी मंडळी भारताचा इतिहास धार्मिक पायावर आधारीत गृहितकांच्या आधारे समजून घेत असतात, असा आक्षेप डॉ. रावसाहेब कसबे घेतात. (पृ.११६. हिंदु मुस्लीम प्रश्न व सावरकराचा हिंदुत्ववाद) जेम्स मीलने ब्रिटीश भारताचा इतिहास हा ग्रंथ लिहीला. त्याने आपल्या ग्रंथात भारताच्या इतिहासाची हिंदु संस्कृती, मुस्लीम संस्कृती, आणि ब्रिटीश संस्कृती अशी तीन काळखंडात विभागणी केली. हा जेम्स मील प्रणीत इतिहास दृष्टीकोन हिंदुत्ववाद्यानी स्विकारला. या संदर्भात डॉ. रावसाहेब कसबे आपल्या वरील ग्रंथात पृ-११६ वर लिहीतात- २० व्या शतकाच्या सुरुवातीला जे इतिहास लेखन राष्ट्रवादी भुमीकेतून झाले त्यावर मिलच्या या पध्दतीचा खुप प्रभाव होता. हे सारे इतिहास लेखन प्राच्य विद्या पंडीताच्या सिध्दांतावर भीस्त ठेवणारे असल्याने पुन्हा एकदा प्राचिन भारताला हिंदु भारत असे नाव देऊन प्राचीन भारताच्या उदात्तीकरणाची चढती कमान त्यांचेकडुन सुरु झाली. भारताला भुतकाळ होता. इतिहास होता हे त्यांचे म्हणणे राष्ट्रवाद्याच्या भुतकाळा विषयीच्या जाणीवाना पाया प्राप्त करुन देणारे ठरले हे खरे आहे. परतुं या प्राच्य विद्या पंडीताच्या लिखाणाने व संशोधनाने इतिहास लेखनाच्या क्षेत्रात त्यामुळे एकीकडुन विशिष्ठ धर्मावर अधिष्ठित असा जमातवादी दृष्टीकोन आणि दुसरीकडुन राष्ट्रवादी दृष्टीकोन यांनी धुमाकुळ घातला आणि समाजात जातीय वैराचे बीज पेरले गेले. त्यामुळे इतिहासाला राजकीय मिथकांच्या पातळीवर आणून ठेवण्याचे पाप कांही इतिहासकारांकडुन झाले आहे.(११६)

स्वा. सावरकरांनी लिहीलेले “इतिहासाची सहा सोनेरी पाने” अभ्यासल्यास त्यांनी मांडलेला एकांगी दृष्टीकोन सहजपणे लक्षात येतो. स्वा. सावरकरांचा मुस्लीमांसंबंधीचा दृष्टीकोन स्पष्टच आहे. भारतातील हिंदुत्ववाद्यांनी मुसलमानांना सातत्याने शत्रु मानले आहे. सावरकरांनी मांडलेली आणि हिदुत्ववाद्यांनी सातत्त्याने उल्लेखलेली मुस्लीम आक्रमणाची परंपरा व त्यांनी येथे केलेला विध्वंस, त्यांनी मंदिराची लुटण्याची परंपरा पाहता हे स्पष्ट होते की मंदीर लुटण्याची परंपरा केवळ मुस्लीमांची नव्हती. अशी अनेक उदाहरणे देता येतील की, हिंदु राजानी इतर राजे लोकांच्या क्षेत्रातील मंदीरे लुटलेली आहेत. इ.स.११९३ ते १२१० या काळात राज्य करणारा एक परमार राजा सुभात वर्मा यांने गुजरातवर स्वारी करून दाभोई व खंबायत येथील बऱ्याच जैन मंदिरांचा विध्वंस केला. काश्मिरचा राजा हर्ष याने स्वतःचा खजीना भरण्यासाठी आपल्या राज्यातील फक्त चार मंदीरे सोडुन उरलेली सर्वच सर्व मंदीरे लुटली. त्या विरूध्द कोणत्याही धर्म पंडीताने ब्र ही काढला नाही. काश्मिर मधील हजारो हिंदु मंदीरे मुसलमानांनी लुटली हा उल्लेख केला जात असताना मंदीरे लुटण्याची परंपरा राजा हर्ष याने सुरवात केली याचा उल्लेख करावा लागेल. वस्तुस्थिती अशी आहे की, मंदीरे ही संपत्तीची केंद्रे ठरलेली होती. या मंदीराकडे अगणीत संपत्ती दानाच्या स्वरूपात जमा होत असे. अनेक राजे लोकानीं शत्रु प्रदेशातील मंदीर लुटणे वावगे मानले नाही. इस्लामच्या पाइकांनी, सुलतानानी मंदीरे लुटण्याची पंरपरा सातत्याने केली असा आक्रोश हिंदुत्ववाद्यांनी सातत्याने केला परंतु त्याच वेळेस अनेक सुलतानानी आणि बादशहांनी हिंदु धर्मिय मंदीराना जमीनी दिल्या याचा मात्र उल्लेख केलेला नाही. इतिहास लेखन हे वस्तुतः वस्तुनिष्ठ स्वरूपाचे, निरपेक्ष दृष्टीकोनातुन होणे आवश्यक असते. कोणत्याही समाजाचा इतिहास समजुन घेत असताना एखाद्या राजा महराजाचा किंवा सुलतानाचा किंवा एखाद्या सत्ताधारी वर्गाचा इतिहास आणि त्याचा तपशील समजुन घेणे पुरेसे नाही. तर संपुर्ण समाजाच्या सामाजिक आर्थिक आणि सांस्कृतीक जीवनाचा तपशील समजुन घेणे आवश्यक असते. इतिहासात धार्मिक सुसंवाद आणि धार्मिक संघर्ष एकाच वेळी नांदलेला आहेत. त्याचप्रमाणे त्यांच्या प्रभावाखाली येणारे काळखंडही आहेत. हे असे का घडत होते या सगळ्याची कारणे समाजाच्या सामाजिक आणि आर्थिक रचनेत आणि त्यांच्या गुणविशेषणात सापडतात.

"हरबन्स मुखीया म्हणतात त्या प्रमाणे- इतिहास लेखनाच्या क्षेत्रात जमातवादी आणि राष्ट्रवादी या दोघानेही केलेले पाप म्हणजे स्वतःला सोयीचा असणारा मुद्दा ठळकपणे पुढे आणण्यासाठी त्या विरुद्धचे पुरावे अंधारात ठेवणे आहे. (रावसाहेब कसबे, हिंदू - मुस्लीम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदूत्ववाद, पृ. ११७.)

स्वा. सावरकर निश्चितपणे प्रखर राष्ट्रवादी होते. परंतु इतिहासाची सहा सोनेरी पाने अभ्यासताना त्यांचा एकांगी दृष्टीवाद आणि मुस्लीमा संबंधीचा आकस स्पष्टपणे जाणवतो. कोणताही राजकीय नेता आपल्या समाजाचे राजकीय संघटन घडवून आणण्यासाठी विशिष्ठ राजकीय विचार परंपरा स्विकारतो हे सिद्ध असले तरी परंतु ही विचार परंपरा वस्तुनिष्ठ सामाजिक जीवन मुल्याशी संबंधीत असणे आवश्यक असते. हिन्दुत्ववाद्यानी भारताचा प्राचीन इतिहासाचे वैभवशाली चित्र रेखाटलेले आहे. हा सुवर्णकाळ केवळ इस्लामच्या आक्रमणामुळे संपलेला आहे असे चित्र हिंदुत्वाद्याची भारतीय जनमानसापुढे उभे करण्याचा प्रयत्न केलेला आहे. स्वा. सावरकर आणि इतर हिंदुत्ववाद्यानी ज्या प्राचीन वैभवशाली इतिहासाचे चित्र रेखाटलेले आहे त्या चित्रात सामान्यमाणसाचा नेमका दर्जा व सहभाग कोणता व

किती होता? हा प्रश्न या अनुषंगाने निर्माण होतो. हिंदुत्ववाद्याचा वरीष्ठ जातीवर्गाच्या हितसंबंधावर आधारलेला राष्ट्रवाद उभा करावयाचा आहे ही सामान्य कष्टकरी व शेतकरी समुहाच्या जीवनांत परिवर्तन करणारे हिंदुसंघटन निर्माण करावयाचे आहे हे स्पष्ट झाले पाहिजे.

इतिहास १ - सावरकराचा इतिहास लेखनामागचा दृष्टिकोण भावनात्मक असुन तो बुध्दीवादी नाही. जो महापुरूष इतिहासाकडे बुध्दीवादी दृष्टीने पाहत नसतो तो वर्तमानाकडे देखील बुध्दीवादी दृष्टीने पाहत नसतो. - "इतिहासाची सहा सोनेरी पाने" हे स्वप्नरंजन आहे. अशा प्रकारचा इतिहास का आणि कशासाठी लिहला जातो? या संबधी E. H. Carr म्हणतो. "The Historian belong not to only, to the past, But to the present - Prof. Trevor - Roper tells us that "The Historism ought to Love the past. This is a dubins injection. To Love the past may easily be an expression of the nostalgia - Romanticism of old men and old society. A symptomn of loss of faith and interest in the present and future. Clinch for click, I should prefer the one about freeing one self from the dead hand of the past. The function of the Historiam is neither to Love the past. Nor the emanipation from the past. But to understand this the key to the understanding of the present.

इतिहासाबाबत सावरकराचा समग्र दृष्टीकोण अभ्यासल्यास सावरकरांना अभिप्रेत असलेला भारताचा इतिहास हा केवळ हिंदू मुस्लिम संघर्षाचा इतिहास वाटतो. वस्तुतः इतिहासातील राजकीय घटना हया तत्कालिन सामाजिक, आर्थिक जीवनाशी निगडीत असतात. म्हणुन राजकीय घटनाच्या अनुषंगााने सामाजिक जीवन, सामाजिक व्यवहार, आर्थिक संबंध यांची साक्षेपी चिकित्सा होणे गरजेचे असते. आपल्या स्वतःच्या राजकीय मताच्या सोयीसाठी इतिहास लेखन करणे म्हणजे, इतिहासाची प्रतारणा करण्यासारखे आहे.

१९८० च्या दशकानंतर भारतीय राजकारण एका वेगळ्या वळणावर आल्याचे दिसते. भारतातील हिंदुत्ववादी राजकारण सावरकरांच्या ज्या विचारावर उभे करण्याचा प्रयत्न हिंदुत्ववाद्यांनी केला त्यांचा साक्षेपी इतिहास व ऐतिहासिक मिमांसा आपण आतापर्यंत केलेली आहे. या सबंध ऐतिहासिक पार्श्वभूमीवर हिंदुत्ववादी राजकारण जनसामान्याच्या मनावर प्रभाव निर्माण करु शकले नाही. या शिवाय स्वातंत्र्य प्राप्तीनंतर गांधी आणि नेहरु प्रणीत सर्वसमावेशक राजकारण व त्या राजकारणासाठी हवी असलेली विचारपंरपरा कॉंग्रेस पक्षाने घडवून आणलेली होती.

**निष्कर्ष आणि समारोप**

स्वा. सावरकराप्रमाणेच हिंदुत्वाचा विचार मांडणारा दुसरा विचारवंत पुज्य गोळवळकर गुरूजी. १९३९ नंतर गुरूजीचा वाढत गेलेला प्रभाव आणि त्यांच्या प्रभुत्वाखाली असणारी. बुध्दीमान तरूणाची रा. स्व. संघटना यांच्यामुळे भारतीय राजकारणांत अवतरलेले धार्मिक उन्मादाचे राजकारण या बाबी विचारकरण्यायोग्य आहेत. They forget there was already fulpledged ancient nation of Hindu (Bunch of Thoughts / १४२)

स्वा. सावरकर आणि पुज्य गोळवळकर गुरूजी यांना अभिप्रेत असणारे आम्ही हिंदू म्हणजे नेमके कोण? हिंदूची संकल्पना स्पष्ट करताना स्वा. सावकरकरांनी जे परिमाण स्विकारले ते व्यापक सैध्दातिंक तत्वावर अधिष्ठीत आहे. ज्यांची पुण्यभू, पितृभू आणि मातृभू - ही (असेतू हिमाचल) भारत भू आहे आणि या भारतीय भूमीवर जीवन व्यतीत करणारी प्रत्येक व्यक्ती ही या भूमीसी भावनिष्ठ आहे ती व्यक्ती हिंदू आहे.

स्वा. सावरकर आणि गोळवळकर गुरूजीच्या मुलभूत विचार सरणीत फरक असून संघाचेही व्यक्तीमत्व भिन्न स्वरूपाच्या वैचारिक सिध्दांतावर विकसीत झालेले आहे. स्वा. सावरकर प्रखर बुध्दीवादी तर गुरूजी धर्मनिष्ठ, सावरकर विज्ञानाप्रमाणे जीवनात परिवर्तन करू इच्छिणारे तर गुरूजी संस्कृतीप्रमाणे विज्ञानालाच मर्यादीत करू पाहणारे सावरकर रूढी भंजक व पुर्णपणे यांत्रिक भौतिकवादी, तर गुरूजी रूढींना नवा अर्थ प्राप्त करून देणारे आणि चैतन्यवदी. भारतातील विकसीत झालेला हा हिंदूत्ववाद टोकाची सोनरूपे घेवून अविष्कृत झालेला आहे. स्वा. सावरकरांच्या हिंदूत्वाविषयी पुज्य गोळवळकर गुरूजी म्हणतात, सावरकर प्रणीत हिंदुत्ववाद हा नकारात्मक व प्रतिक्रियावादी म्हणून संबोधतात. पु. गोळवळकरांनी अभिव्यक्त केलेला हिंदूत्ववाद हाच खरा विधायक हिंदूत्ववाद असे स्वतःच गुरूजी म्हणतात. हिंदुत्ववादी संघटनाचा तात्विक आधार हाच मुलतः दुभंगलेला आहे. या दुभंगलेपणाचा व्यावहारिक फायदा हिंदूत्ववाद्यानी अतिशय चतुराईने घेतला आहे.

प्रसंगी सावरकरांचा आणि प्रसंगी गोळवळकरांचा राजकारणाच्या आवश्यकतेनुसार या हिंदुत्ववाद्यानी वापर केलेला आहे. भारताच्या इतिहासातील इस्लामिक आक्रमणांकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात मात्र त्यांच्यात एकवाक्यता आहे. मुसलमानाच्या क्रौयाचा इतिहास हे एक वास्तव आहे. हिंदुत्ववादी भारतीय इतिहासातील मुस्लीमाच्या क्रौयाचा तपशील सातत्याने का उगाळतात? हा एक महत्वाचा प्रश्न आहे. मुस्लीमांनी या देशात जवळ जवळ सातशे वर्षे सत्ता भोगली. त्यांची सत्ता स्थीर करण्यामध्ये इथल्या स्थानिक हिंदूनी मदत केली. हे असे का घडले? याचा चिकीत्सक दृष्टीने हिंदुत्ववादी विचार करीत नाहीत. मुसलमानाना भारतात यश प्राप्त झाले. ते कोणत्या परिस्थितीत झाले? तत्कालीन भारतीय सत्ताधा-यांचे वर्तन कसे होते? ते प्रजाहितदक्ष राजे होते का? तत्कालीन सामाजिक जीवन कसे होते? भारतातील हिंदू धर्माचे नेमके स्वरूप कसे होते? या प्रश्नांची आत्मचिकित्सक उत्तरे शोधण्याचा प्रयत्न ही हिंदुत्ववादी मंडळी करीत नाहीत. आधुनिक भारताचे प्रश्न, आजचे राजकीय वास्तव आणि हिंदू धर्माचे विशुध्द तात्विक स्वरूप आणि आजचा हिंदु धर्म आणि त्यातील वास्तव समजून घेणे अपरिहार्य ठरते.

**संदर्भ ग्रंथ**


| | | |
|---|---|---|
| १ | मा.स. गोळवळकर | पत्ररुप श्री गुरुजी, भारतीय विचार साधना पुणे १९८५ पृ ३५६, ३५७ |
| २ | म.द. देवरस | हमारा राष्ट्रीय जीवन भारतीय विचार साधना पुणे १९७८ पृ. ६९/७० |
| ३ | ज.द. जोगळेकर | हिंदुस्थानचे राष्ट्रीयत्व श्रीराम विजय मुद्रणालय बडोदे १९५० पृ. १६५ |
| ४ | ज.द. जोगळेकर | हिंदुस्थानचे राष्ट्रीयत्व श्रीराम विजय मुद्रणालय बडोदे १९५० पृ. ७० |
| ५ | मा.गो. वैद्य | हिंदु, हिंदुत्व आणि हिंदुराष्ट्र आजच्या संदर्भात भारतीय विचार साधना पुणे १९८६ पृ. ४ |
| ६ | ज.द. जोगळेकर | हिंदुत्व, भारतीयत्व नि निधर्मीशासन राष्ट्रविचार साहित्य प्रकाशन मुंबई १९८२ |
| ७ | बोल अमृताचे | मो.ग. तपस्वी पृ ३२४ |
| ८ | बोल अमृताचे | मो.ग. तपस्वी पृ ३२५ |
| ९ | बोल अमृताचे | मो.ग. तपस्वी पृ ३२५ |
| १० | भारतीय विचार साधना पुणे | अ) सामाजिक समता व हिंदु संघटन |